# भारत आणि पाकिस्तान मध्ये कैद्यांच्या यादीचे आदानप्रदान

01 जानेवारी, 2025

भारत आणि पाकिस्तान मध्ये आज राजनैतिक माध्यमातून नवी दिल्ली आणि इस्लामाबाद येथे उभय देशांच्या ताब्यात असलेल्या नागरी कैदी आणि मच्छिमारांच्या याद्यांचे एकाचवेळी परस्पर आदानप्रदान करण्यात आले. दूतावास संपर्क (कॉन्सुलर ॲक्सेस) 2008, बाबतच्या द्विपक्षीय करार तरतुदी अन्वये प्रत्येक वर्षी 1 जानेवारी आणि 1 जुलैला याद्यांचे आदानप्रदान केले जाते.

2. भारताने आपल्या ताब्यातील पाकिस्तानी किंवा पाकिस्तानी असल्याचे मानले जातात अशा 381 नागरी कैदी आणि 81 मच्छिमारांची नावे पाकिस्तानला सोपविली. त्याचप्रमाणे, पाकिस्तानने त्यांच्या ताब्यातील भारतीय किंवा भारतीय असल्याचे मानले जातात अशा 49 नागरी कैदी आणि 217 मच्छिमारांची नावे भारताला सोपविली.

3. भारत सरकारने पाकिस्तानकडे त्यांच्या ताब्यात असलेले नागरी कैदी, बोटींसह मच्छिमार आणि भारतीय सैन्यातील बेपत्ता व्यक्ती यांची लवकर सुटका आणि प्रत्यार्पणाची मागणी केली आहे. शिक्षा पूर्ण केलेले 183 भारतीय मच्छिमार आणि नागरी कैदी यांची सुटका आणि प्रत्यार्पण करण्याविषयीची विचारणा भारताने पाकिस्तानकडे केली होती. यासोबतच, पाकिस्तानला त्यांच्या ताब्यात असलेले 18 नागरी कैदी आणि मच्छिमार, जे भारतीय मानले जातात आणि आतापर्यंत त्यांना दूतावास संपर्क (कॉन्सुलर ॲक्सेस) देण्यात आलेला नाही. त्यांना तत्काळ दूतावास संपर्क (कॉन्सुलर ॲक्सेस) देण्याची मागणी केली आहे. सुटका आणि प्रत्यार्पणाच्या प्रतीक्षेत असलेले भारतीय किंवा ज्यांना भारतीय मानले जाते असे नागरी कैदी आणि मच्छिमार यांची सुरक्षा, संरक्षण आणि कल्याणाची सुनिश्चिती करण्याची विनंती पाकिस्तानकडे करण्यात आली आहे.

4. एकमेकांच्या देशातील कैदी आणि मच्छिमार यांच्याशी संबंधित सर्व मानवतावादी बाबींना प्राधान्य देण्यासाठी भारत वचनबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर, भारताने आपल्या ताब्यातील पाकिस्तानी मानले जातात अशा 76 नागरी कैदी आणि मच्छिमार यांची राष्ट्रीयत्व पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी पाकिस्तानकडे केली आहे. राष्ट्रीयत्व पडताळणीच्या अभावी त्यांचे प्रत्यार्पण प्रलंबित आहे.

5. सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे वर्ष 2014 पासून 2,639 भारतीय मच्छिमार आणि 71 भारतीय नागरी कैदी यांचे पाकिस्तानातून भारतात प्रत्यार्पण झाले आहे. यामध्ये वर्ष 2023 पासून आतापर्यंत प्रत्यार्पण झालेल्यांमध्ये 478 भारतीय मच्छिमार आणि 13 भारतीय नागरी कैद्यांचा समावेश आहे.

नवी दिल्ली

01 जानेवारी, 2025